**ONE DAY MULTIDISCIPLINARY**
**INTERNATIONAL SEMINAR**
**ON**

# PLIGHT OF INDIAN FARMERS : ISSUES AND CHALLENGES

## भारतीय शेतकऱ्यांच्या व्यथा वेदना, दशा : समस्या व आव्हाने

[illegible] February, 2019



Organized by
Tararani Vidyapeeth's

## KAMALA COLLEGE, KOLHAPUR

NAAC Reaccredited 'A' grade (3.12 CGPA)
College with Potential for Excellence
www.kamalacollegekop.edu.in

# AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL (AMIERJ)

A Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
SJIF Impact Factor : 6.236 ISSN : 2278-5655
Vol. VIII Special Issue -X, February 2019


# PLIGHT OF INDIAN FARMERS: ISSUES AND CHALLENGES

# भारतीय शेतकऱ्यांच्या व्यथा वेदना, दशा : समस्या व आव्हाने


■ EDITORS ■

Dr. Smt. Neeta Dhumal
Department of English,
Kamala College, Kolhapur

Dr. Shri. Sujay Patil
Head, Department of Marathi,
Kamala College, Kolhapur

■ CO-EDITOR ■

Dr. Shri. Netaji Powar
Co-ordinator, YCMOU Study Centre,
Kamala College, Kolhapur



# KAMALA COLLEGE, KOLHAPUR

NAAC Reaccredited 'A' grade (3.12 CGPA)
College with Potential for Excellence
www.kamalacollegekop.edu.in

Aarhat Publication and Aarhat Journal's
Peer Reviewed Interdiciplinary Research Journal
ISSN – 2278-5655
Online and Print Journal
SJIF Impact Factor : 6.236
Vol. VIII Special Issue No. X

# Plight of Indian Farmers : Issues and Challanges
# भारतीय शेतकऱ्यांच्या व्यथा वेदना, दशाः समस्या व आव्हाने

In Collaboration with

**KAMALA COLLEGE, KOLHAPUR**
**NAAC Reaccredited 'A' grade (3.12 CGPA)**
**College with Potential for Excellence**
**www.kamalacollegekop.edu.in**

© Principal, Kamala College, Kolhapur



| | | |
|---|---|---|
| **Editors** | : | Dr. Smt. Neeta Dhumal<br>Dr. Shri. Sujay Patil |
| **Co-Editor** | : | Dr. Shri. Netaji Powar |
| **Technical Assistant** | : | Smt. Poonam Pargavkar |
| **Published by** | : | Aarhat Publication and Aarhat Journal's<br>Mobile No. 9822307164/8355852142 |
| **Printed by** | : | Shreekant Computers and Publishers,<br>University Road, Opp. Khare Mangal Karyalaya,<br>Kolhapur 416 008 |
| **Print** | : | February 2019 |



**Editor Disclaimer :** The views expressed in Research papers published in this Journal by the authors are their own and the publisher and editor do not accept any legal responsibility regarding plagiarism or inaccuracy for the views of authors.

| Sr. No. | Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 168 | मल्टीप्लायरची सेंद्रिय शेती- शेतकर्यांना एक वरदान | सौ. प्राची सुशांत खाडे | 710-714 |
| 169 | शेतकऱ्यांच्या आत्महत्याः कारणे व उपाय | प्रा. विलास मारूती सुर्यवंशी<br>प्रा. किरण सदाशिव कांबळे | 715-718 |
| 170 | शेतकरी जीवनातील मराठी साहित्यातील दर्शन | निलेश मधुकर लंगोटे | 719-721 |
| 171 | स्वातंत्र्योत्तर भारतातील शेतकरी चळवळीची बदलती दिशा - विशेष संदर्भ महाराष्ट्र | डॉ. दत्तात्रय पांडुरंग खराडे | 722-724 |
| 172 | महाराष्ट्र राज्य शासनाच्या कृषीविषयक धोरणे व योजनांचा थोडक्यात आढावा (२०१४ ते २०१८) | श्रीम. सरकाळे तेजश्री तानाजी | 725-730 |
| 173 | महाराष्ट्रातील शेतकरी संघटनांच्या चळवळी | श्रीम. चव्हाण स्वाती रघुनाथ | 731-734 |
| 174 | 'मराठी ग्रामीण कवितेतील शेतकरी जीवनाचे दर्शन' | डॉ. निता भिसे–ढावरे | 735-738 |
| 175 | कृषी रोजगार व महिला | प्रा.समीर महादेव कुंभारकर | 739-741 |
| 176 | कोकणातील शेतमजुरांचे प्रश्न | प्रा. वामन अंकुश गावडे | 742-744 |
| 177 | शेतकरी जीवनाचे संस्कृत साहित्यातील दर्शन या विषयांतर्गत "कौटिलीय अर्थशास्त्र" या ग्रंथातील आर्य चाणक्यांचे कृषिविषयक विचार | प्रा.सौ.रचना सौरभ शहा | 747-750 |
| 178 | पंचगंगा नदी प्रदूषण आणि शेतजमीन | Mr. Sandip Arjun Patil | 751-753 |
| 179 | महात्मा फुले यांच्या साहित्यातील शेती व शेतकरी जीवन | प्रा. डॉ. नामदेव कृष्णा मोळे | 754-757 |
| 180 | शेतकऱ्यांची आत्महत्या - समस्या व उपाय | बळवंत के जाधव | 758-761 |
| 181 | जलयुक्त शिवार योजनेचा लातूर तालुक्यातील पीक रचनेवर झालेला परिणाम : एक अभ्यास | प्रा. जाधव सुधीर बब्रुवान<br>गायकवाड जीवन हनमंतराव | 762-766 |
| 182 | महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कारणे व उपाय | डॉ. शैलजा माने | 767-773 |
| 183 | शेतकरी आत्महत्या : न सुटलेला प्रश्न | भागवत वसंत बजरंग | 774-777 |
| 184 | महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या समस्या : एक ऐतिहासिक अभ्यास | श्री. बाबली गंगाराम गावडे<br>प्रा. डॉ. मनोज साताप्पा जाधव | 778-781 |
| 185 | शेतकरी आंदोलन व शरद जोशींचे नेतृत्व | प्रा. नंदकुमार रामचंद्र कोल्हापूरे | 782-783 |
| 186 | स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतातील शेतकरी चळवळी | प्रा. सचिन ताराचंद्र धुर्वे | 784-786 |
| 187 | महाराष्ट्रातील शेतकरी संघटनाची शेतकरी आंदोलने | डॉ. रविंद्र पांडुरंग भणगे | 787-789 |
| 188 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे व उपाय | मिणचे मिनाश्री गंगाधर | 790-793 |
| 189 | भारतातील स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकरी चळवळ | संतोषकुमार पांडूरंग कुंभार | 794-796 |
| 190 | शेतकरी आंदोलन व महाराष्ट्रातील शेतकरी संघटना | डॉ. सुपडा रामभाऊ इंगळे | 797-799 |
| 191 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे व उपाय | प्रा.श्रीमंत तुकाराम कावळे | 800-803 |
| 192 | पर्यावरणीय समस्या आणि भारतीय शेती | प्रा .सुनिल सुखदेव लोखंडे | 804-807 |
| 193 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या मानसशास्त्रीय दृष्टीकोन | डॉ सौ. संजीवनी जगदीश पाटील | 808-811 |
| 194 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे व उपाय | डॉ. बी.एस. पाटील | 812-816 |

# शेतकरी आंदोलन व शरद जोशींचे नेतृत्व

प्रा. नंदकुमार रामचंद्र कोल्हापूरे,
सहयोगी प्राध्यापक,राज्यशास्त्र विभाग,शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज.

**प्रस्तावना :**

भारतात आणि महाराष्ट्रामध्ये शरद जोशी यांनी शेतकरी व शेतीमालाला रास्त भाव मिळावा, 'भिक नको हवे घामाचे दाम' ही आर्त हाक देऊन आंदोलनाचे नेतृत्व केले. शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्याचे प्रणेते, शेतीतीलच नव्हे तर देशातील दारिद्र्याची कारणमिमांसा करणारे, परंपरागत विचारसरणीला बेधडक धक्के देत मानवी शाश्वत मुल्ये व स्वानुभव मांडत शरद जोशींनी भारतीय भारतीय शेतीला नवनवे आयाम मिळवून दिले. शेती व शेतकऱ्यांचे व्यवस्थेतील स्थान केवळ धोरणकर्त्यांनाच नव्हे तर खुद शेतकऱ्यांना त्याचे भान आणून देण्याचे काम केले.

**शेतकरी आंदोलन व शरद जोशींचे नेतृत्व :**

शरद जोशींचा जन्म १३ सप्टेंबर १९३५ रोजी झाला. त्यांचे वडील श्री अनंत जोशी मुळात मध्यमवर्गीय जीवन जगत होते. ते पोस्ट खात्यामध्ये नोकरी करीत होते. पोस्ट खात्यातील बदल्यांमुळे शरद जोशींचे प्राथमिक शिक्षण हे सातारा, बेळगांव या ठिकाणी झाले. त्यानंतर रुंगठा हायस्कुल नाशिक येथून ते दहावी उत्तीर्ण झाले. तर मुंबई येथील सिडनेहॅम कॉलेजमधून बी. कॉम. वएम. कॉम.प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. पुढे शरद जोशींनी कोल्हापूर येथील कॉमर्स कॉलेजमध्ये प्राध्यापकाची नोकरी केली.१९५७ साली शरद जोशी आय. ए. एस. झाले.पुढे १९६७ साली ते संयुक्त राष्ट्र संघामध्ये नोकरीस रुजू झाले.१९७७ साली ते भारतातपरत आले. पुणे येथील आंबेठाण या गावी त्यांनी २४ एकर कोरडवाहू शेती विकत घेतली. या शेतावर त्यांनी शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान वापरुन शेती केली. या शेतीमध्ये आधुनिकतंत्रज्ञान, बी बियाणे, खते वापरुन निरनिराळे प्रयोग केले. पण उत्पादन खर्च भरुन निघेल असे उत्पन्न मिळाले नाही. त्याचवेळी शेती विकास व भारतीयदारिद्रयता या विषयाचे त्यांनी भरपूर अध्ययन केले.१९७७ मध्ये त्यांनी गावंडी या गावी '११ भूमिपूत्र'या नावाची संस्था उभारली. ज्याच्या जवळ अडीच तीन एकर जमीन आहे. अशा अल्पभूधारक, अत्यल्पभूधारक कोरडवाहू शेतकऱ्यांना शरद जोशींनी एकत्र करुन सामुहिक शेतीचा प्रयोग केला. परंतु सामूहिक पद्धतीने शेतीमध्ये काम करण्याची इच्छा कुणालाही झाली नाही. परिणामी त्यांचा हा पहिला प्रयोग अयशस्वी झाला. शेतीच्या दुसऱ्या प्रयोगात शरद जोशींनी भांडवल गुंतवणूक करुन जमीन खरेदी केली. शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञान व पैसा वापरला. परंतु त्यातून फायदा झाला नाही शेतीवर जो खर्चहोतो तेवढी किंमत पिकाच्या किंमतीतून कधी परत मिळाली नाही. म्हणजे जेवढा खर्च केला तेवढा कधी वसूल झाला नाही. तेव्हा त्यांच्या असे लक्षात आले की, भारतीय शेतकऱ्यांचे दारिद्र्य हे कोरडवाहू शेतीत आहे.

शेतीमध्ये केलेल्या या विविध प्रयत्नांवरुन त्यांना आलेल्या अनुभवावरुन शेतकरी संघटनेची व आंदोलनाची उभारणी झाली. शरद जोशीयांनी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये शेतकरी आंदोलनाचे नेतृत्व केले. या शेतकरी संघटनेच्या आंदोलनाची सुरुवात १९७८ साली झाली तेव्हापासून ते सातत्याने आंदोलने उभारीत आहेत. वर्षानुवर्षे दारिद्र्यात जीवन जगत आलेल्या शेतकऱ्यांचे व शेतीचे प्रश्न त्यांनी मांडले. त्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी विविध आंदोलने उभारली. पोशिंद्याच्या आत्मसन्मानासाठी व शेतीमालाला रास्त भाव मिळावा यासाठी त्यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले. तसेच आंदोलनाशिवायही शेतकऱ्यांचे प्रश्न कसे सोडवावेत? त्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना करता येतील यासाठी त्यांनी अनेक पुस्तकांचा अभ्यास करुन शेतीच्या अर्थशास्त्राची सैद्धांतिक मांडणी सुस्पष्ट आणि तळागाळातीलबळीराजाला समजेल अशा सोप्या भाषेत केली आहे.[१] शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न व शासनाचे धोरण याविषयी शेतकऱ्यांमध्ये जाणीव निर्माण करुन शेतकऱ्यांना संघटीत करण्याचे प्रयत्न केले.

श्री शरद अनंत जोशी यांनी १९७९ साली शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी पोशिंद्याच्या आत्मसन्मानासाठी शेतकरी संघटनेची स्थापना केली. शेतकरी संघटनेचा राज्य व राष्ट्रीय पातळीवर अल्पावधीतच विस्तार झाला. शेतकरी संघटना महाराष्ट्रातील विदर्भामध्ये प्रथम विस्तारत गेली. कालांतराने पश्चिममहाराष्ट्र, मराठवाड्यामध्ये तीचा विस्तार झालापुढे हळूहळू शेतकरी संघटना संपूर्ण महाराष्ट्रामध्येविस्तारत गेली. शेतकरी संघटना व संघटीत शेतकऱ्यांच्या माध्यमातून शरद जोशींनी 'भिक नको हवे घामाचे दाम', 'शेतीमालाला रास्त भाव मिळालाच पाहिजे'[२]अशा गगनभेदी

घोषणा देवून शेतकऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. पुढे १९७८ साली सर्वप्रथम कांदा आंदोलनाचे नेतृत्व केले. शरद जोशींच्या मते शेतकऱ्यांचे दारिद्रय हे कोरडवाहू शेतीत आहे आणि शेतीमालाला रास्त भावमिळवून देणे हे शेतकरी संघटनेचे उद्दिष्ट नसून सर्व देशातील गरिबी हटविणे हे शेतकरी संघटनेचे उद्दिष्ट आहे.[3] सदर उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी शेतकरी संघटनेने सामाजिक आर्थिक, राजकीय क्षेत्रात तसेच शेती प्रश्नाच्या निर्मिती विषयी, शेतमजूराच्या प्रश्नाबाबत, डंकेल गॅट व मुक्त अर्थव्यवस्थेबाबत साम्यवादी व डाव्या पक्षांबाबत विशिष्ट प्रकारचीभूमिका स्विकारली. ही विचारसरणी संघटनेची विविध आंदोलने, लढे यातून विकसीत झाली व संघटनेला आपली कार्ये पार पाडताना उपयुक्त ठरते. या विचारसरणीच्या जोरावर संघटनेने सातत्यपूर्ण विकास घडवून आणला व आंदोलने शरद जोशींच्या नेतृत्वाखाली केले. नाशिक येथे ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी ऊस आंदोलन, १९८० चे उपोषण, १९८० चे विदर्भातील कापसाच्या भाववाढीसाठी केलेले चक्काजाम आंदोलन, १९८१ साली निपाणी येथील तंबाखू आंदोलन, १९८२ चे दुध आंदोलन, १९८६ चे ज्वारी आंदोलन, १९८६ चे अकोला येथील कापूस आंदोलन व शेतकऱ्यांचे कर्जमुक्ती आंदोलन या अशा अनेक विविध शेतकरी आंदोलनाचे शेतकरी संघटनेच्या माध्यमातून आंदोलनाचे शरद जोशींच्या नेतृत्वाखाली केले. शरद जोशींनी शेतकरी संघटना पक्षीय राजकारणापासून पूर्णत: अलिप्त राहील अशी भुमिका १९७८–८७या सुरुवातीच्या काळात घेतली होती.शेतकरी संघटनेची राजकीय भुमिका सतत बदलत राहीली आहे. निवडणुकीच्या राजकारणाला सरावलेल्या मंडळींना शेतकरी संघटनेची भुमिका अनाकलनीयच राहीली आहे. शेतकरी संघटनेने स्वतंत्र भारत पक्ष नावाचा आपला वेगळा पक्ष स्थापन केला. तो आजही कार्यरत आहे.

**सारांश :**

शरद जोशींच्या नेतृत्वाखाली आंदोलनाची भूमिका शेतकऱ्यांच्या शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव मिळविणे हा आहे. शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारीत किंमत मिळाली तर शेतकरी कर्जबाजारी होणार नाही. शेतमजूरांच्या राहणीमानात बदल होईल. तसेच देशाचे उत्पादन वाढेल. ग्रामीण भागामध्ये नवनवे उद्योग सुरु होतील. इंडीया व भारत या दोन संकल्पना स्पष्ट करताना इंडीया म्हणजे शोषक व भारत म्हणजे शोषित आहे हे दाखवून दिले आहे. शरद जोशींनी गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. गरिबी हटविणे हा शेतकरी संघटनेचा उद्देश आहे. गरीब म्हणजे शेतकरी आहेत तर त्यांनी गरीब म्हणजे एक वर्ग आहे असे मानले आहे. अशाप्रकारे शरद जोशी यांनी शेतकरी संघटनेचे तत्वज्ञान, इंडीया व भारत या संकल्पना मांडल्या आहेत. पुढे शरद जोशी यांनी मांडलेल्या शेती प्रश्नांचे स्वरुप, शासनाबद्दलची कल्पना, शेतमजूराबद्दलचे विचार, शेती प्रश्नाची निर्मिती, मार्क्स व डावे पक्ष या विविध घटकांबद्दल मांडलेली वैचारिक भूमिका व या वैचारिक भूमिकेच्या आधारावर लढविलेले लढे या बाबींचा समावेश शेतकरी संघटनेच्या विचारप्रणालीमध्ये केला आहे.

**संदर्भ सूची :**


१. धनागरे द. ना., प्रभावी नेतृत्व (लेख) मा. खा. शरद जोशी अमृत महोत्सवीस्मरणिका २००९–१०, द्वारा – श्री कैलास पवार, औरंगाबाद–४३१००१, पृ.क्र. ३०१
2. ॲड. पंडीत सा. मा. (लेख), अमृत महोत्सवी स्मरणिका २००९–१०, पृ.क्र. ३१५
३. जोशी शरद, शेतकरी संघटना विचार व कार्यपद्धती – जनशक्ती वाचक चळवळ, समर्थ नगर, औरंगाबाद, १९८२, पृ.क्र. २०
४. जोशी शरद, प्रचलीत अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश, जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद, डिसेंबर १९८५,
५. पेंडसे अरुणा, भारतीय अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक बदल व शेतकरी संघटना, समाज प्रबोधन पत्रिका, बेळगांव, अंक १८०, ऑक्टो. डिसें.२००७